R.No. MHHMAR/25/A3029

R.No. MHHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ६ वे, अंक नं. : ४८

दि.३० जानेवारी २०२६,वार: शुक्रवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रु.

# दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक - अशोक हनवते मो. 9421094991, 7264079990

## धर्माच्या आधारावर निर्माण झालेले देश टिकलेले नाहीत मात्र धर्मनिरपेक्षतेचा भारत टिकला आहे..!- डॉ भीमराव यशवंत आंबेडकर









नवी मुंबई / के. एच. हनवते :- वाशी (नवी मुंबई) : भारतीय स्वातंत्र्यदिन (१५ ऑगस्ट) हा जसा महात्मा गांधीना समर्पित आहे त्याचप्रमाणे भारतीय प्रजासत्ताक दिन (२६ जानेवारी) हा डॉ बाबासाहेब आंबेडकर यांना समर्पित होणे आवश्यक आहे. धर्माच्या आधारावर निर्माण झालेले पाकिस्तान, बांगलादेश टिकलेले नाहीत, त्यांची आज काय अवस्था झाली आहे हे दिसत आहे. भारत देश हा धर्माच्या आधारावर नसून धर्मनिरपेक्ष संविधानामुळे टिकला आहे, मात्र संविधान विरोधक सत्तेत असल्यामुळे संविधान बदलण्याच्या भाषा करतात, तर आम्हाला हिंदू राष्ट्र बनवायचे असल्याचे ही जाहीर बोलले जात आहे त्याबद्दल खेद व्यक्त करून आता देशात संविधान समर्थक व संविधान विरोधक असे दोन विभाग झाले आहेत असे सारांशाने प्रतिपादन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नातू, दि. बुद्धिस्ट सोसायटी ऑफ इंडियाचे ट्रस्टी राष्ट्रीय कार्याध्यक्ष व समता सैनिक दलाचे राष्ट्रीय अध्यक्ष: डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर यांनी, (भारतीय बौद्ध महासभा) नवी मुंबई जिल्हा महिला शाखा प्रथम वर्धापनदिना निमित्त भव्य महिला धम्म परिषद आणि श्रामणेरी-बौद्धाचार्या व उपासिका प्रशिक्षण शिबिर समारोप कार्यक्रमात बुद्ध प्रतिष्ठान विहार प्रांगण, सेक्टर १५ वाशी, नवी मुंबई येथे दिनांक २६ जानेवारी २०२६ रोजी केले. दहा दिवसीय श्रामणेरी- बौद्धाचार्या प्रशिक्षण शिबिराच्या संघ नायिका भिक्खुणी आर्या संघमित्राजी होत्या.

यावेळी ड. एस. के. भंडारे (ट्रस्टी/ राष्ट्रीय उपाध्यक्ष, केंद्रीय कार्यालय प्रमुख) यांनी आपल्या मार्गदर्शनात असे सांगितले की, भारतीय बौद्ध महासभेत प्रथम महाउपासिका मीराताई आंबेडकर यांनी कार्यकारिणीत उपाध्यक्ष व दोन सचिवा नियुक्ती केल्या आणि आता डॉ. भीमराव पण यशवंत आंबेडकर यांनी महिलांची राज्य, जिल्हा, तालुका कार्यकारिणी स्वतंत्र करून भारतीय संविधानातील खऱ्या अर्थाने स्त्री पुरुष समानता सुरु केली. तेवढेच नाही तर भारतीय बौद्ध महासभेत सर्वात जास्त महिलांची संख्या आहे व महाराष्ट्रात प्रथमच महिला जिल्हा शाखेने एकाच वेळा दहा दिवसीय श्रामणेरी- बौद्धाचार्या प्रशिक्षण व उपासिका शिबिर, भव्य महिला धम्म परिषद आणि रॅली चे आयोजन केल्याबद्दल केंद्रीय, महाराष्ट्र, नवीमुंबई जिल्हा शाखांच्या सर्व महिलांचे व त्यांना मदत केलेल्या बुद्ध प्रतिष्ठान व नवी मुंबई जिल्हा पुरुष कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले .

तसेच धम्म परिषद मध्ये तीन विषयावर मार्गदर्शन करण्यात आले. सुप्रियाताई कासारे (केंद्रीय प्रशिक्षण विभाग उपप्रमुख) यांनी बौद्ध धम्मामध्ये महिलांची झालेली प्रगती काल- आज आणि उद्या, विशाखाताई निळे (केंद्रीय शिक्षिका अहिल्यानगर) यांनी संविधानामुळे महिलांना मिळालेले हक्क व अधिकार आणि उज्वलाताई खरात (केंद्रीय महिला विभाग सदस्या) यांनी डॉ बाबासाहेब आंबेडकर यांनी मनुस्मृती का जाळली या विषयावर मार्गदर्शन केले. या परिषदेस सुषमाताई पवार (राष्ट्रीय उपाध्यक्षा व केंद्रीय महिला विभाग प्रमुख), डॉ. अनंत हर्षवर्धन (अध्यक्ष, बुद्ध प्रतिष्ठान) यांनी हॉल उपलब्ध करून विशेष योगदान दिले, बी एच. गायकवाड गुरुजी (राष्ट्रीय सचिव) ड. डॉ. एस. एस वानखडे (राष्ट्रीय सचिव व केंद्रीय प्रशिक्षण विभाग प्रमुख), रागिणीताई पवार (केंद्रीय महिला विभाग उप प्रमुख), भारतीताई शिराळ (केंद्रीय महिला विभाग सचिवा), स्वातीताई शिंदे (अध्यक्ष, महाराष्ट्र महिला शाखा), चंदाताई कासले (अध्यक्ष, मुंबई प्रदेश महिला शाखा), विलास कांबळे (अध्यक्ष, मुंबई प्रदेश) इत्यादी उपस्थित होते.

श्रामणेरी-बौद्धाचार्या प्रशिक्षण शिबिराच्या प्रमुख निवासी शिक्षिका म्हणून स्वातीताई गायकवाड (उपाध्यक्षा, संस्कार विभाग, महाराष्ट्र राज्य महिला शाखा) यांनी काम केले. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शोभाताई कांबळे (अध्यक्षा , नवी मुंबई जिल्हा महिला शाखा) होत्या तर सूत्रसंचालन ज्योतीताई जाधव (सरचिटणीस, नवीमुंबई जिल्हा महिला शाखा), आणि संजय झनके ( सरचिटणीस,नवीमुंबई जिल्हा शाखा ) यांनी केले. श्रामणेरी-बौद्धाचार्या प्रशिक्षण शिबिरात १३जिल्ह्यातून ३३ महिला आणि उपासिका शिबिरात नवी मुंबई जिल्ह्यातील महिला सहभागी झाल्या होत्या. धम्म परिषदेच्या अगोदर डॉ. भीमराव य. आंबेडकर यांची विशेष रथातून मुंबईच्या समता सैनिक दलाच्या बँड पथकासह नवी मुंबई च्या समता सैनिक दलाचे मधुकर हिवराळे व मेजर अनिल शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली रॅली काढण्यात आली. परिषदेमध्ये नवी मुंबई जिल्ह्यातील विविध शाखांना पुरस्कार देण्यात आले. परिषदेसाठी नवी मुंबई जिल्हा शाखेतील सर्व शाखेचे बौद्ध समाज महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## व्ही एस पँथर्स विद्यार्थी आघाडी मराठवाडा विभागाच्या वतीने अजितदादा पवार यांना श्रद्धांजली



लातूर : येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या विद्यार्थी आघाडी मराठवाडा विभागाच्या वतीने राजे शिवाजी नगर (वसवाडी) येथे श्रद्धांजली सभा आयोजित करण्यात आली होती . यावेळी विद्यार्थी आघाडीचे मराठवाडा अध्यक्ष प्रीतम दंडे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले . यानंतर संघटनेचे मार्गदर्शक रवि कुरील आणि मराठवाडा विद्यार्थी आघाडी अध्यक्ष प्रीतम दंडे यांनी मनोगतातून अजितदादा पवार यांना श्रद्धांजली अर्पण केली . यावेळी जिल्हा उपाध्यक्ष महादेव कांबळे, शहर उपाध्यक्ष महेश सोनवणे, सिद्धार्थ गायकवाड,शहर सचिव रोहित दंडे,शहर संघटक रितेश जांभळे, दिनेश शिंदे,हर्षवर्धन लोकरे, अभिजीत कलवले, विरनाथ गायकवाड, नितीन मिरकले, सुबोध महाळंगीकर, विष्णू माने,अभिजीत माने, दिलीप सुर्यवंशी, सुमित कांबळे,सिराज मुल्ला,सुदर्शन ओव्हळ माऊली गोबाडे, महेश पवार आदी पदाधिकारी उपस्थित होते...

## जिल्हा परिषद व पंचायत समित्यांसाठी ५ ऐवजी ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी

मुंबई :- उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनामुळे राज्यात तीन दिवसांचा दुखवटा जाहीर करण्यात आला असल्यामुळे १२ जिल्हा परिषदा व त्यांतर्गतच्या १२५ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकांच्या उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आला असून ५ फेब्रुवारी २०२६ ऐवजी आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी मतदान; तर ७ फेब्रुवारी २०२६ ऐवजी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी मतमोजणी होईल.

राज्य निवडणूक आयोगाने या जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांसाठी १३ जानेवारी २०२६ रोजी निवडणूक कार्यक्रम जाहीर केला होता. त्यानुसार नामनिर्देशनपत्र दाखल करणे, नामनिर्देशनपत्र मागे घेणे, चिन्ह वाटप आणि निवडणूक लढविणाऱ्या अंतिम उमेदवारांची यादी प्रसिद्ध करणे इत्यादी टप्प्यांची प्रक्रिया पूर्ण झाली आहे. त्यापुढील मतदान, मतमोजणी आणि निवडून आलेल्या सदस्यांची नावे राजपत्रात प्रसिद्ध करणे हे टप्पे शिल्लक आहेत.

मा. सर्वोच्च न्यायालयाने या निवडणुकांसाठी ३१ जानेवारी २०२६ च्या पुढे फक्त दोन आठवड्यांची मुदत वाढ दिली आहे; परंतु उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे २८ जानेवारी २०२६ रोजी अपघाती निधन झाल्यामुळे राज्य शासनाने राज्यात २८ जानेवारी २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत दुखवटा जाहीर केला आहे. या कालावधीचा विचार करून जिल्हा परिषदा व पंचायत समित्यांच्या निवडणुकांच्या कार्यक्रमातील उर्वरित टप्प्यांमध्ये बदल करण्यात आले आहेत. त्यानुसार संबंधित जिल्हाधिकारी सुधारित निवडणूक कार्यक्रमाची सूचना ३१ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध करतील. आता ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ७.३० ते सायंकाळी ५.३० या वेळेत मतदान होईल. त्यामुळे जाहीर प्रचाराची समाप्ती ५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री १० वाजता होईल. संबंधित ठिकाणी ९ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी १० वाजता मतमोजणी सुरु होईल. निकाल जाहीर झाल्यानंतर संबंधित ठिकाणची आचारसंहिता संपुष्टात येईल. निवडून आलेल्या सदस्यांची नावे शासन राजपत्रात ११ फेब्रुवारी २०२६ पर्यंत प्रसिद्ध केली जातील.

## आज शुक्रवार रोजी पंचायत समिती सभागृह येथे सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन-इनामदार व बनसोड



केज/प्रतिनिधी-आज केज येथील पंचायत समिती सभागृहात केज तालुक्यातील सर्व सामाजिक संस्था,संघटना व पक्षीय आणि केज वासियांच्या वतीने सार्वजनिक श्रद्धांजली, शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे तरी केज शहर व तालुक्यातील सर्व राजकीय पक्ष, सामाजिक संस्था, संघटनेच्या पदाधिकार कार्यकर्ते, व युवक,नागरिकांनी आणि पत्रकार बांधव यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड व गटनेते हारूणभाई इनामदार यांनी केले आहे.

आज शुक्रवार ३० जानेवारी २०२६ रोजी ठीक ४-०० वाजता पंचायत समिती सभागृह येथे सर्व सामाजिक संस्था, संघटना व सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्ते यांच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

बारामती येथे झालेल्या विमान दुर्घटनेत राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार, दादांचे खाजगी सुरक्षा अधिकारी विदिप जाधव, विमान चालक कॅप्टन शांभवी पाठक, कॅप्टन सुमित कपूर, हवाई सुंदरी(फ्लाईट अटेंडंट), पिंकी माळी या सर्वांचे दुर्दैवी निधन झालेले आहे.

या दुर्घटनेत मृत्युमुखी पडलेल्या वरील सर्वांना संपूर्ण केज वासियांच्या वतीने आधारांजली-श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी शोकसभेचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी केज शहरासह तालुक्यातील सामाजिक संस्था, संघटना व सर्वपक्षीय पदाधिकारी कार्यकर्त्यांनी आणि युवक, नागरिकांनी वेळेत उपस्थित राहून या कार्यक्रमांमध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन सीताताई बनसोड व हारूणभाई इनामदार यांनी समस्त केज वासियांच्या वतीने केले आहे.

## केज येथील भागवत कथेचा ४ था दिवस; भाविकांचा कथेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद



केज/ प्रतिनिधी-केज येथील पंचायत समिती प्रांगणात ह.भ.प.केशव महाराज शास्त्री यांच्या कथेला २६ जानेवारी पासून सुरुवात करण्यात आलेले आहे.आज गुरुवार रोजी भागवत कथेचा चौथा दिवस असून भाविकांनी भागवत कथेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला आहे.

केशव महाराज शास्त्री यांनी कौरव पांडवांची कथा सांगितली यामध्ये प्रामुख्याने श्रीकृष्णाकडे दुर्योधन व अर्जुन गेले असता दुर्योधन प्रथम जाऊनही उशाला बसले व अर्जुन आपण मागण्यासाठी आलो या उद्देशाने पायथ्याशी बसले ज्यावेळेस कृष्ण जागे झाले त्यावेळेस अर्जुन श्रीकृष्णाच्या दृष्टीस पडले यामुळे उठताच अर्जुनाला विचारले अर्जुन बोल काय? हवय तुला यावेळी दुर्योधन मनाला मी अगोदर आलो आहे. मला अगोदर माझी मागणी मान्य करा परंतु श्रीकृष्णाने माझ्या दृष्टीस अर्जुन अगोदर पडला त्यामुळे तो लहान आहे. त्याला मागण्याचा अधिकार आहे ही कथा केशव महाराज शास्त्री यांनी श्रोत्यांना समजेल अशा भाषेत सांगितले यावेळी पंचक्रोशीतील व केज शहरातील महिला व पुरुष मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय...

# अहंकार, संकुचित वृत्ती आणि तणाव : आधुनिक माणसाचे खरे संकट

कोण दिवस येईल कसा, नाही देहाचा भरवसा!

ही साधी पण अत्यंत खोल अर्थाची ओळ माणसाच्या आयुष्याचे अंतिम सत्य सांगते. माणसाचे शरीर, वेळ, परिस्थितीकशाचाच भरवसा नाही. तरीही माणूस मात्र स्वतःला सर्वशक्तिमान समजून वागतो. आजच्या काळात धन, दौलत, संपत्ती, पद, प्रतिष्ठा आणि अधिकार यांच्या जोरावर माणूस स्वतःला मोठे सिद्ध करण्याचा प्रयत्न करत आहे. या सगळ्या भौतिक गोष्टी तात्पुरत्या असतानाही त्यातून निर्माण होणारा अहंकार मात्र कायमस्वरूपी नुकसान करून जातो.

अहंकार ही एक अशी मानसिक अवस्था आहे जी माणसाला वास्तवापासून दूर नेते. अहंकार असलेला माणूस इतरांना कमी लेखतो, त्यांच्या कष्टांचे मोल जाणत नाही आणि स्वतःलाच सर्वश्रेष्ठ समजतो. परिणामी, माणसामाणसांतील नात्यांमध्ये दुरावा निर्माण होतो. समाजात सहकार्याऐवजी स्पर्धा वाढते, संवादाऐवजी संघर्ष वाढतो आणि आपुलकीऐवजी संशय वाढतो. हेच आजच्या समाजाचे विदारक चित्र आहे.

आजची जीवनशैली तणाव निर्माण करणारी बनली आहे. सततची धावपळ, अपेक्षांचा वाढता ताण, यशाची अतीहाव आणि अपयशाची भीतीया सगळ्यांमुळे माणूस आतून अस्वस्थ झाला आहे. या तणावाच्या मुळाशी डोकावले तर लक्षात येते की, त्यामागे प्रामुख्याने अहंकार आणि तुलना ही दोन कारणे आहेत. आपण किती पुढे आहोत, इतरांपेक्षा किती मोठे आहोत, समाजात आपली प्रतिमा कशी आहेया विचारांनी माणसाची शांतता हिरावून घेतली आहे.

संकुचित विचारसरणी ही अहंकाराचीच एक विकृत रूप आहे. जात, धर्म, भाषा, प्रांत, आर्थिक स्थिती, शिक्षण, पद यांवरून माणसाला माणसापासून वेगळे केले जाते. ही संकुचित मानसिकता समाजाला विभागते, माणुसकीला तडा देते आणि सामाजिक सलोखा नष्ट करते. विशाल मनाचा माणूस कधीच भेदभाव करत नाही; उलट तो समजून घेतो, स्वीकारतो आणि सहअस्तित्वावर विश्वास ठेवतो.

आपले मन अथांग महासागरासारखे असावेशांत, खोल आणि विशाल. लहानशा गोष्टींनी ढवळून न निघणारे, अपमानाने खचून न जाणारे आणि यशाने माजून न जाणारे. प्रांजळपणा, नम्रता, आदर आणि सहानुभूती या मूल्यांमुळेच माणूस खऱ्या अर्थाने मोठा ठरतो. कपटी विचारसरणी, द्वेष, मत्सर आणि वाईट प्रवृत्ती मनात घर करून बसल्या तर त्या हळूहळू माणसाच्या मानसिक आरोग्यावर घाला घालतात.

आजूबाजूला वावरणाऱ्या लोकांमध्ये धोकेबाजी, दगाबाजी, स्वार्थीपणा आणि संधीसाधूपणा मोठ्या प्रमाणावर दिसून येतो. अशा प्रवृत्ती माणसाच्या आयुष्यात सतत मानसिक त्रास आणि असुरक्षितता निर्माण करतात. म्हणून अशा लोकांना वेळीच ओळखून स्वतःपासून दूर ठेवणे ही काळाची गरज आहे. हे दुर्लक्ष नव्हे, तर आत्मसन्मान आणि मानसिक शांततेसाठी घेतलेला योग्य निर्णय आहे.

आज मानसिक आरोग्य हा विषय अत्यंत महत्त्वाचा झाला आहे. नैराश्य, चिंता, चिडचिड, अस्वस्थता या समस्या दिवसेंदिवस वाढत आहेत. यावर औषधांपेक्षा अधिक प्रभावी उपाय म्हणजे जीवनाकडे पाहण्याची दृष्टी बदलणे. साधेपणा स्वीकारणे, अपेक्षा मर्यादित ठेवणे, समाधान मानणे आणि स्वतःशी प्रामाणिक राहणेहे गुण माणसाला आतून मजबूत करतात.

जीवन म्हणजे केवळ यश मिळवण्याची शर्यत नाही, तर त्या प्रवासात आनंद शोधण्याची कला आहे. हसणे, खेळणे, निसर्गाच्या सान्निध्यात वेळ घालवणे, आपल्या माणसांसोबत संवाद साधणेया साध्या गोष्टी माणसाला पुन्हा माणूस बनवतात. मोठ्या बंगल्यापेक्षा शांत झोप अधिक मौल्यवान आहे, आणि मोठ्या पदापेक्षा समाधानी मन अधिक श्रेष्ठ आहे.

शेवटी एवढेच म्हणावेसे वाटते की, आयुष्य अनिश्चित आहे, वेळ अमूल्य आहे आणि माणुसकी सर्वोच्च मूल्य आहे. अहंकाराचा त्याग करून, संकुचित वृत्तीला तिलांजली देऊन, सकारात्मक आणि प्रांजळ विचारसरणी स्वीकारली तरच तणावमुक्त, आनंदी आणि अर्थपूर्ण जीवन शक्य आहे.

हसत-खेळत, समाधानाने आणि माणुसकी जपत जीवन जगाहेच खरे यश आहे.



दि बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडिया तथा भारतीय बौद्ध महासभा कार्याध्यक्ष व समता सैनिक दल राष्ट्रीय अध्यक्ष : *डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर* यांच्या प्रमुख उपस्थितीत स्वातंत्र्य भारताच्या ७७ व्या प्रजासत्ताक दिनी, बुद्ध प्रतिष्ठान वाशी नवी मुंबई येथे २६ जानेवारी २०२६ रोजी *धम्म परिषद* मोठ्या उत्साहात संपन्न झाली, त्यावेळी *दैनिक महावृत्त* सहसंपादक : *कल्याणराव हनवते* (बौध्दाचार्य) यांनी सदिच्छा भेट घेऊन *दैनिक महावृत्त* विशेष अंक भेट दिला. त्या वेळचे दुर्मिळ क्षणचित्र.

# बौद्ध समाज प्रत्येक वेळी फक्तच भावनिक आंदोलनासाठी एकवटतो!

बौद्ध समाजाची संघटन शक्ती आणि रस्त्यावरील लढे लढण्याचे धाडस प्रचंड आहे. आणी ही अतिशय मोठी मनाला ऊर्जा देणारी व अभिमान बाळगावा अशी गोष्ट आहे.परंतु ज्याप्रमाणे हे तमाम बौद्ध बांधवांचे संघटन डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ या नामांतरासाठीच्या लढ्यात जबरदस्त प्रदर्शन करून सतत १६ वर्ष संघर्ष करते त्याचप्रमाणे भोतमांगे कुटुंबावर झालेला घोर अण्याय घ्या! काय तो समाजाचा जबरदस्त एकोपा होता? आणि तसेच दीक्षाभूमी आणि चैत्यभूमी वरील तुफान गर्दी बघा! शासनाला आणि प्रशासनाला या ठिकाणच्या एकोप्याची व एका जुटीची आवर्जुन दखल घ्यावीच लागते. आणि त्या गोष्टीचा प्रत्येक बौद्ध बांधवांना मोठा सहर्ष अभिमान वाटतो व आनंद पण मिळते.या सर्व तुलनेत मात्र खास करून जो तमाम वंचीत विश्वाच्या जगण्या मरण्याचा प्रश्न आहे आणि सोबतच हक्क व अधिकाराचा खास लढा ज्या राजकारणाच्या माध्यमातून यशस्वी करायचा असतो ना! नेमक्या त्याच रणमैदानावर आमची मंडळी वेगवेगळ्या गटात आणि नको त्या मतभेदात प्रत्येक वेळी विखुरते आणि जो तो गट एकवटून येण्या ऐवजी संघशक्तीच्या विसंगतच भूमिका घेऊन असते.ही वस्तुस्थिती आमच्या नींदेला व मागासले पणाला कारणीभूत ठरत आहे.

आमच्यामते बहुतेक करून राजकारण एका समाजाच्या भरवशावर करता येत नसते आणि कोणताही एक समाज सत्ता संपादन करू शकत नाही.म्हणून सत्ते पासून वंचित असणाऱ्या अनेक समाजांची मोट बांधावी लागत असते.तरच यश संपादन करण्याची चिन्ह दिसून येत असतात तेव्हा बौद्ध समाजात काही राजकारणातील प्रस्थापित मंडळी भेद निर्माण करण्यासाठी बहुजन बांधवांच्या चुंगल्या करून फोडा झोडा आणि राज्य करा अशी कुटील नीती वापरून वंचिता-वंचितांमध्ये दुही निर्माण करतात. म्हणून काही बौद्ध बांधवांचे असे उद्गार निघतात की,करा ना! बहुजन-बहुजन,द्या ना! त्यांना सत्ता. मग लोकसभेला पहा! कुठे जातात त्यांचे मतं.अशा नाना प्रकारच्या कांगळ्या करून आमच्या संघ शक्तीचे विघटन केले जाते.आणि आमचे काही बौद्ध बांधव! म्हणतात ना कम ताकद मरने की निशाणी! तसेच कम बुद्धी हरणे की निशाणी! भाऊ म्हणतात तेच खरं आहे! या हरामखोर, बेईमानांना आता मतच द्यायचं नाही.असे भराभर अनेक आमचे निरागस पाखरं प्रस्थापित सत्ताधाऱ्यांच्या गळाला लागुन चळवळीचे तथा स्वतःचे ही नुकसान करून बसतात.

सध्या भारत देशात सर्वत्र डॉ बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळ्यांची तोडफोड सुरू आहे घोर अपमान चालू आहे संविधानाला भरदिवसाच्या जाळून टाकल्या जाते आमच्या दलीत आई बहिणींच्या अब्रूची लुटा लूट सुरू असतांनाच आमचे आठवले साहेब,जोगेंद्र कवाडे सर,राजेंद्रजी गवई, बळवंत वानखडे,वर्षाताई गायकवाड,नितीन राऊत साहेब अशा खूप साऱ्या नेत्यांची नावं आहेत की जे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांना आपला बाप म्हणतात आणि भारतीय संविधानाला आपल्या स्वतंत्र्याची हृदय मानतात परंतु तो बाप आणि ते हृदय भयंकर तार तार गेल्या जात असताना ही लेकरं खुशाल पणे आप आपल्या सत्तेच्या चत्कोरासाठी जर नाही जनाची तर मनाची तरी लाज लज्जा विकून मुग गिळून बसल्यागत वागत असतील तर भर रस्त्यात बाकी आंबेडकर जनते कडून यांची वस्त्र का फाडल्या जाऊ नयेत? परंतु तसे न होता

आता ही परंपरा रूढ झालेली दिसते आहे. या रूढी परंपरेला आता जोपर्यंत आळा बसत नाही आणि तमाम बौद्ध समाज हा राजकीय दृष्ट्या बौद्धिक अंगाने तंदुरुस्त व सुदृढ होत नाही तोपर्यंत आमच्या आंबेडकरी चळवळीला पाहिजे ती गतिशीलता प्राप्त होऊ शकत नाही. या फुले आंबेडकरी चळवळीला राजकीयदृष्ट्या फार मोठी गतिशीलता आणायची असेल तर सर्व बौद्ध बांधवांनी त्यां नेत्यांसारखी बघ्याची भूमिका न घेता तथागत भगवान बुद्धाची तूम कुछ भी करो! मै नही करुंगा! ही मंगल वाणी आत्मसात करून एकाच मार्गे चालण्याचा दृढ निश्चय ज्या दिवशी बौद्ध समाज करेल तो दिवस सोन्याची पहाट घेऊन आल्याशिवाय राहणार नाही. एवढेच या ठिकाणी सांगतो आणि थांबतो!

**जय भीम जय भारत**
**जीवन बोदडे भांबेरी**
**मो.नं.८८८८७५७७०३**

# रामी, रामु ते महामाता रमाई... (महामाता रमाईचे सामाजिक मातृत्व)

रत्नागिरी जिल्हा हा रत्नांची खाण ! या जिल्ह्याने अनेक महान रत्न भारताला दिली. दापोली तालुक्यातील वणंद हे महामाता रमाईचे माहेर गाव. तर मंडणगड तालुक्यातील अंबडवे हे सासर . जणू या तांबड्या मातीने शोषितपणाचा गुण जन्मजात दिलेला.

महामाता हा शब्द फक्त जन्म देणाऱ्या आईसाठी नसतो, तर समाजाच्या उन्नतीसाठी स्वतःचे जीवन अर्पण करणाऱ्या स्त्रीसाठी वापरला जातो. रमाई यांना महामाता म्हटले जाते, कारण त्यांचे मातृत्व केवळ आपल्या मुलांपुरते मर्यादित नव्हते, तर ते संपूर्ण समाजापर्यंत पोहोचलेले होते.

रमाईंच्या जीवनात वैयक्तिक दुःख खूप होते . गरिबी, लेकरांचे निधन, कुटुंबातील संकटे. तरीही त्यांनी स्वतःच्या दुःखाला प्राधान्य दिले नाही. त्यांनी बाबासाहेबांना शिक्षण घेण्यासाठी, समाजासाठी लढण्यासाठी मोकळे केले. त्यांच्या या त्यागामुळेच बाबासाहेब समाजक्रांती घडवू शकले. म्हणजेच रमाईंच्या सहनशीलतेमुळे आणि पाठिंब्यामुळे कोट्यवधी वंचित लोकांना न्याय आणि हक्क मिळवण्याचा मार्ग खुला झाला.आई आपल्या मुलासाठी जे करते, तेच रमाईने समाजासाठी केले.

त्यांनी स्वतः उपाशी राहून बाबासाहेबांचा अभ्यास चालू राहावा याची काळजी घेतली.

स्वतःच्या दुःखातही पतीला धीर दिला. कधीही त्यांच्या कार्यात अडथळा आणला नाही.ही वृत्ती म्हणजे सामाजिक मातृत्व ! जिथे स्त्री आपल्या कुटुंबापलीकडे जाऊन समाजाच्या कल्याणाचा विचार करते.

रमाईंचे मातृत्व रक्ताच्या नात्यांपुरते मर्यादित नव्हते तर ; ते मानवतेशी जोडलेले मातृत्व होते. त्यांनी आपल्या वैयक्तिक आयुष्याचे सुख गमावले, पण समाजाला उज्ज्वल भविष्य मिळवून देण्यासाठी योगदान दिले. म्हणूनच त्या फक्त बाबासाहेबांच्या पत्नी नव्हत्या, तर समाजाच्या उभारणीतील आई होत्या.

रमाईंचे जीवन दाखवते की आईपण फक्त लेकरांना वाढवण्यात नसते, तर समाजाला घडवण्यातही असते. त्यांच्या त्याग, प्रेम आणि सहनशीलतेमुळे त्यांना महामाता ही उपाधी प्राप्त झाली. त्यांचे मातृत्व हे सामाजिक मातृत्वाचे तेजस्वी उदाहरण आहे.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या महान कार्यामागे शांत, संयमी आणि त्यागमूर्ती रमाईंचा वाटा आहे, रमाईंच्या जीवनातील हेच खरे सौंदर्य आहे.जे त्यांच्या मनात, कष्टात आणि निःस्वार्थ प्रेमात दडलेले होते.

रमाई अत्यंत गरिबीत वाढल्या. लहानपणीच आई-वडिलांचे छत्र हरपले. शिक्षणाची संधी मिळाली नाही, पण जीवनाने त्यांना खूप काही शिकवले. दुःख सहन करण्याची ताकद आणि संकटातही हसत राहण्याची वृत्ती हे त्यांच्या जीवनाचे मोठे सौंदर्य होते.

बाबासाहेब शिक्षणासाठी परदेशी गेले तेव्हा घरची सर्व जबाबदारी रमाईवर होती. घरात दारिद्र्य, मुलांचे आजार, अन्नाची कमतरता तरीही त्यांनी कधी तक्रार केली नाही. तुम्ही शिका, मोठे व्हा, समाजासाठी काम करा असे म्हणून त्यांनी बाबासाहेबांना नेहमी धीर दिला. पतीच्या स्वप्नांसाठी स्वतःची स्वप्ने बाजूला ठेवणे ,हाच त्यांच्या जीवनातील खरा गोडवा होता.रमाईंचे साधेपण हे त्यांच्या सौंदर्याचे आणखी एक रूप होते. त्यांना ना दागिने हवे होते, ना सुखसोयी. त्यांना फक्त आपल्या पतीचे यश आणि समाजाची प्रगती हवी होती. त्या अत्यंत श्रद्धाळू, शांत आणि प्रेमळ स्वभावाच्या होत्या. घरातील सर्वांना जपणे, मदत करणे, आणि पतीच्या कार्यात अडथळा येऊ न देणे हे त्यांचे रोजचे कर्तव्य होते.हे सामान्य स्त्रीला शक्य नाही. म्हणूनच त्या केवळ पत्नी नव्हत्या, तर बाबासाहेबांच्या कार्याच्या पायाभरणीतल्या एक भक्कम शक्ती होत्या . त्याग, प्रेम, सहनशीलता आणि निष्ठा या गुणांनी रमाईंचे जीवन तेजस्वी झाले.

रमाईचे जीवन संघर्षाची कहाणी दुःखद आहे, त्यांच्या वाट्याला आलेले दुःख हे सामान्य माणसाला खचवणारे होते. तरीही त्या ढळल्या नाहीत. उलट त्या बाबासाहेबांच्या पाठीशी खंबीरपणे उभ्या राहिल्या. हे त्यांचे धैर्य नेमके कोणत्या प्रेरणेतून आले, याचा विचार करणे महत्त्वाचे आहे.

रमाई लहान असतानाच त्यांच्या डोक्यावरचे आई-वडिलांचे छत्र हरपले. बालपणीच अनाथ होण्याचे दुःख त्यांनी अनुभवले. बालवयातच जीवनाने त्यांना कठोर वास्तव दाखवले. लाड, माया, सुरक्षितता याऐवजी त्यांच्या आयुष्यात संघर्ष, अभाव आणि असुरक्षितता आली. अशा परिस्थितीत वाढलेल्या रमाईंच्या मनात सहनशीलतेची आणि परिस्थितीशी जुळवून घेण्याची ताकद निर्माण झाली. हीच त्यांच्या आयुष्याची पहिली प्रेरणा ठरली.

लग्नानंतरही त्यांचे दुःख थांबले नाही. सासरे रामजी बाबांचे निधन झाले. घरातील आधारस्तंभ हरपल्यामुळे जबाबदाऱ्या अधिक वाढल्या. आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. घर, संसार, मुलांची काळजी याचे सर्व ओझे रमाईंच्या खांद्यावर आले. पण त्यांनी हे ओझे कधीही तक्रार न करता स्वीकारले.रमाईंच्या जीवनातील सर्वात वेदनादायी प्रसंग म्हणजे चार लेकरांचे निधन. आईसाठी लेकरं म्हणजे तिचं हृदय असतं. स्वतःच्या मुलांना एकामागून एक गमावणे, हे असह्य दुःख आहे. अशा दुःखाने अनेक स्त्रिया कोसळल्या असत्या. पण रमाई कोसळल्या नाहीत. त्यांनी अश्रू पुसले आणि पुन्हा उभ्या राहिल्या. कारण त्यांना एक मोठं ध्येय दिसत होतं , ते म्हणजे,बाबासाहेबांचे शिक्षण आणि त्यांचं समाजकारण. त्यांनी बाबासाहेबांना कधीही खचू दिले नाही. उलट त्यांना धीर दिला. तुम्ही शिका, मोठे व्हा, समाजासाठी काम करा.ही प्रेरणा कुठून आली?

ही प्रेरणा आली होती त्यांच्या पतीवरील अपार प्रेमातून, त्यांच्या त्यागी स्वभावातून, आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे समाजासाठी काहीतरी मोठं घडत आहे याच्या जाणिवेतून. त्यांना समजलं होतं की बाबासाहेब फक्त आपल्या कुटुंबासाठी नव्हे, तर संपूर्ण समाजाच्या उद्धारासाठी झटत आहेत. म्हणून त्यांनी स्वतःचं वैयक्तिक दुःख बाजूला ठेवलं. पतीच्या ध्येयावर असलेला विश्वास,

स्वतःच्या दुःखापेक्षा समाजाच्या भल्याला दिलेलं महत्त्व आणि निःस्वार्थ प्रेम यामुळे त्यांच्या आयुष्यातील दुःखांनी त्यांना तोडले नाही, तर अधिक मजबूत केले. त्या दुःखातूनच त्यांची अंतःशक्ती निर्माण झाली. त्या खंबीर राहिल्या आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महान कार्यात शांतपणे साथ देत राहिल्या. आजच्या आधुनिक स्त्रीसाठी त्यांच्या जीवनातून अनेक महत्त्वाचे बोध घेण्यासारखे आहेत. संकटातही धैर्य न सोडणे. रमाईंच्या आयुष्यात गरिबी, कुटुंबातील मृत्यू, मुलांचे दुःख असे अनेक आघात आले. तरीही त्या खचल्या नाहीत. आजच्या स्त्रीनेही जीवनातील अडचणींना घाबरून न जाता धैर्याने सामोरे जाणे शिकावे.

दुसर म्हणजे ध्येयासाठी त्याग करण्याची तयारी. रमाईंनी स्वतःचे सुख बाजूला ठेवून बाबासाहेबांच्या शिक्षणाला आणि कार्याला महत्त्व दिले. आजच्या स्त्रीनेही आपल्या कुटुंबाच्या, समाजाच्या आणि स्वतःच्या प्रगतीसाठी कष्ट करण्याची तयारी ठेवावी. तिसरी गोष्ट म्हणजे साधेपणा आणि निःस्वार्थ प्रेम. आधुनिक जीवनात भौतिक सुखांना जास्त महत्त्व दिले जाते, पण रमाईंचे जीवन दाखवते की खरे समाधान प्रेम, निष्ठा आणि मूल्यांमध्ये असते.

तसेच, रमाईंच्या जीवनातून स्त्रीची अंतःशक्ती किती महान असते हे समजते. स्त्री फक्त घर सांभाळणारी नसून ती कुटुंबाची आणि समाजाच्या प्रगतीची आधारशक्ती असते.

आधुनिक स्त्रीने रमाईंच्या जीवनातून धैर्य, त्याग, सहनशीलता, प्रेम आणि कर्तव्यनिष्ठा हे गुण घ्यावेत. अशा मूल्यांनीच स्त्रीचे जीवन खऱ्या अर्थाने सुंदर आणि अर्थपूर्ण बनते. जयंती प्रत्यार्थ महामाऊली रामांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन......

**किशोर कासारे**
**मंडणगड दाभट**
**८७६७४२५१८०**

# हळदी कुंकू व तिळगुळ घ्या गोड बोला कार्यक्रमासाठी विधवा बहिणींनी पुढाकार घ्यावा.

१४ जानेवारी रोजी भारत देशात मकर संक्रात हा सण मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सणा दिवशी महिला मुले मुली ज्येष्ठ नागरिक आनंदी असतात. महिला हळदी कुंकवाचा कार्यक्रमांमध्ये एकमेकाला हळदी कुंकू लावून तिळगुळ घेऊन गोड बोला म्हणून संदेश देतात आनंद घेतात. घरी गोडधोड पदार्थ करून खातात. त्या दिवशी शाळेला सुट्टी असते.

मात्र आपल्याच घरातील आपल्याच गावातील आपल्या नातेवाईकापैकी नशिबाने एखादी विधवा महिला असेल तर तिला या उत्साहात हळदी कुंकवाच्या कार्यक्रमात तिळगुळ घ्या गोड बोला या उपक्रमात तिला सहभागी करून घेतलं जात नाही. कारण ते अशुभ म्हणून समजले जाते. तर मी सर्वांना विनंती करतो की, या दिवशी विधवा बहिणींना सन्मान देण्यासाठी जर आपण धार्मिक असाल तर देवळामध्ये घरातल्या देव्हाऱ्यात तिच्या हस्ते दिवा लावा. त्यांच्या हस्ते देवाला नैवेद्य दाखवा.तिला हळदीकुंकू कार्यक्रमांमध्ये सहभागी करून घ्या.नक्कीच आपण यावर विचार करा. हा उपक्रम ज्या गावात चालू आहे त्यांचा मी अभिनंदनच करतो.

परंतु ज्या गावांमध्ये हा उपक्रम चालत नाही, म्हणजे विधवा महिलांना सहभागी करून घेत नाहीत, अशा गावातील विधवा महिलांना मी विनंती करतो की त्या गावातील कोणत्याही जातीच्या सुशिक्षित आणि धाडसी विधवा महिलेने पुढाकार घेऊन गावातील पंधरा वीस ज्या विधवा महिला असतील त्यांची एक यादी करा आणि त्यांना मकर संक्राती दिवशी कोणाच्यातरी घरी बोलवा. त्यांना हळदी कुंकू लावा. तिळगुळ द्या आणि एक छोटी किमतीची एक वस्तू वाण म्हणून द्या. यासाठी माझ्याकडून वैयक्तिक पाचशे रुपये पुढाकार घेणाऱ्या महिलेच्या फोन पे वर पाठवण्यात येईल. ही मदत फक्त पहिल्या वीस विधवा महिला साठीच आहे. विधवा नसणाऱ्या महिलांनी संपर्क करू नये या ज्या महिला सहभागी होतील त्यांच्या पुन्हा एकत्रित कार्यशाळा घेण्याचा विचार असून त्यांचे नेतृत्व उभं करण्याचा हेतू आहे.

हळदी कुंकू तिळगुळ कार्यक्रमांमध्ये ज्या सहभागी होतील त्या महिलेचे नाव मोबाईल नंबर गावाचे नाव आणि मोबाईलवर कार्यक्रमाचे फोटो व व्हिडिओ शूटिंग खालील व्हाट्सअप नंबरवर पाठवल्यास मी आपला आभारी राहील. ज्या महिला पहिल्यांदा या उपक्रमामध्ये सहभागी होतील त्यांचा सन्मान होईल. त्यांच्या चेहऱ्यावर हास्य आणि आनंद समाधान दिसेल. हेच खरे पुण्य असून महिलांना अशा अनिष्ट विधवा प्रथे च्या गुलामगिरीतून मुक्त करण्यासाठी हे छोटे उपक्रम खूप उपयोगी पडतील. आपणास काही शंका असतील तर मला फोन करू शकता. हा उपक्रम करताना जर कुणी विरोध केला तर पोलीस महिला हेल्पलाइन ११२ किंवा १८१ यावर त्वरित संपर्क साधून तक्रार करू शकता ताबडतोब तुम्हाला पोलीस स्टेशन कडून सहकार्य मिळेलचं

**कळावे**
**आपला प्रमोद झिंजाडे व्हॉट्स नंबर**
**७७७५९०३०५२**

# माधवीताईंचा सवाल आणि समाजाची जबाबदारी

२६जानेवारी २०२६,भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन.यानिमित्ताने महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री तसेच नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक येथील पोलीस परेड ग्राउंडवर झेंडा वंदन केल्यानंतर केलेल्या संपूर्ण भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे एकदाही नाव घेतले नाही, त्यामुळे तिथे बंदोबस्ताला असलेल्या वन विभागाच्या कर्मचारी माधवीताई जाधव कानात जीव आणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव ऐकण्यास अधीर झाल्या होत्या, पण मंत्री गिरीश महाजन यांनी संपूर्ण भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे एकदाही नाव घेतले नाही, भाषण संपेपर्यंत कोणालाही काहीच आक्षेप नव्हता. पण बंदोबस्ताला असलेल्या माधवीताई पेटून उठल्या आणि त्यांनी मैदानात धाव घेऊन जोरजोरात मंत्री गिरीज महाजन यांचा निषेध करायला सुरवात केली,तेंव्हा उपस्थितांना कळले की,गिरीश महाजन यांनी संपूर्ण भाषणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले नाही. माधवीताईंनी वातावरण गंभीर केले. त्या सरकारी नोकरीत असूनही त्यांनी नोकरीची पर्वा केली नाही, नोकरी गेली तर वाळूच्या गाड्या भरेल,मातीकाम करेल,सस्पेंड केले तरी चालेल पण बाबासाहेबांचा अपमान सहन करणार नाही,ज्या बाबासाहेबांनी महिलांच्यासाठी आणलेले हिंदू कोड बिल संसदेत चर्चेत घेतले नसल्याने मंत्रिपदाचा राजीनामा दिला,ज्या बाबासाहेबांनी घटना लिहून सर्वांना समानाधिकार दिला, महिलांना सन्मान दिला,ज्यांच्यामुळे मी या पदावर आहे त्या बाबासाहेबांचे नाव मंत्री महाजनांनी मुद्दाम घेतले नाही,नामोल्लेख टाळून बाबासाहेबांची बदनामी केली,असा आरोप माधवीताईंनी केला आहे.जोपर्यंत गिरीश महाजन यांच्यावर ॲट्रोसिटी दाखल होत नाही,तोपर्यंत त्यांनी उपोषण सुरू केले आहे.याला म्हणतात धाडस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील निष्ठा नाहीतर आताच निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीत भीमाच्या लेकींचा (सुज्ञ लेकींचा अपवाद वगळता) वेगळाच अनुभव आला. तो अनुभव डॉ.रजनीकांत गायकवाड यांनी मांडला आहे.त्यांच्या मते निवडणुकीच्या दिवशी भीमाच्या लेकी हजार पाचशे घेतल्याशिवाय निवडणुकीला बाहेर पडत नव्हत्या.मतदानाची वेळ संपत आली होती,चार पाच वाजेपर्यंत भिमाच्या लेकी मतदानाला बाहेर पडत नव्हत्या. शेवटी ज्यांनी मतदानाचे पैसे दिले त्यांना मतदान करायला भीमाच्या लेकी बाहेर पडल्या.विशेष म्हणजे भिमाच्या लेकींनी पाहिले नाही की,आपण जातीयवादी पक्षांच्या उमेदवारांकडून पैसे घेऊन त्यांच्या खाल्लेल्या मिठाला जागून त्यांनाच मतं देत आहोत.हजारपाचशे किती दिवस पुरणार आहेत? ते तर त्याच दिवशी किंवा निवडणुकीचा निकाल लागण्या अगोदरच संपलेही असतील.त्यांच्या मतांमुळे जातीयवादी पक्षांचे उमेदवार निवडून आले.ज्या पक्षांना संपवण्यासाठी आंबेडकरी विचारांचे नेते जीवाचे रान करत असतात. त्यांच्या भाषणाला भीमाच्या लेकी अंतकरणापासून दाद देत असतात.तिथल्यातिथे निर्णय घेतात,की काही झाले तरी आंबेडकरी समाजाच्या उमेदवारालाच मत देणार.पण सभा संपली की काही दिवसात तो जोशही संपून जातो, आणि ऐन निवडणुकीत या माझ्या माय माऊल्या (काही अपवाद वगळता) मतदानासाठी पैसे घ्यायला थांबून राहतात.अगदी आंबेडकरी अनुयायी असलेल्या उमेदवारांकडून सुद्धा. युरोपमध्ये मतदानाचा अधिकार फक्त अमीर उमरावानांच होता,हळू हळू,श्रीमंतांना मतदानाचा अधिकार देण्यात आला,त्यानंतर जमीन मालकांना अधिकार देण्यात आला,कित्येक वर्षे गुलाम आणि शूद्रांना (काळ्यांना) मतदानाचा अधिकार नव्हता.महिलांना तर कित्येक वर्षे मतदानाच्या अधिकारासाठी वाट पहावी लागली.एमेलीन पॅनखर्स्ट या महिलेला आंदोलन करावे लागले.१९०३ मध्ये त्यांनी 'विमेन्स सोशल अँड पोलिटिकल युनियन' काढली .महिलांची संघटना बांधून त्यांनी मतदानाच्या अधिकारासाठी लढाई सुरू केली.मतदानाचा हक्क मिळावा म्हणून भव्य मोर्चे काढले.१९०८ मध्ये महिलांचा लाखोंचा मोर्चा संसदेवर काढला.त्यांना जेलमध्ये जावे लागले.त्यांनी जेलमध्ये आंदोलन सुरू केले,उपोषण केले.सततच्या संघर्षामुळे १९१८ मध्ये ३० वर्षे वयावरील मालमत्ताधारक महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला.सर्व महिलांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी १९२८ साल उजाडावे लागले.पण भारतात घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कलमाची ताकद दाखवली आणि प्रौढ स्त्री पुरुषांना मतदानाचा अधिकार दिला.मतदानासाठी त्यांनी गरीब श्रीमंत भेद केला नाही.टाटा बिर्ला यांच्या मताची किंमत आणि गरीबाच्या मताची किंमत ही सारखीच ठरली. ज्यांना चार दिवस खायला भेटत नाही,ज्यांना अस्पृश्य म्हणून हिनवले जाते,त्यांच्या मताची किंमत ही अति श्रीमंत लोकांच्या बरोबरीची करून ठेवली.बाबासाहेबांचे हे किती मोठे उपकार संपूर्ण भारतावर आहेत.सतत बाबासाहेबांचे नाव मुखात असणारे बाबासाहेबांचे अनुयायी जेंव्हा पैसे घेतल्याशिवाय मतदानाला बाहेर पडत नाहीत,तेंव्हा मन उद्विग्न होते.आज बाबासाहेब असते तर... सतत जातीयवादी पक्षांना मातीत गाडण्याची भाषा करणारे निवडणूकीच्या दिवशी भान विसरून जातीयवादी पक्षाच्या उमेदवारांकडून हजार पाचशे घेऊन मतदान कसे करतात, हेच कळत नाही.आज भारताचे चित्र काय आहे?या चित्राला आपणच कारणीभूत नाही का? याचा विचार होणार आहे का? पैसे घेऊन मतदान करणारे अडाणी किंवा गरीबच नाहीत तर सधन आणि सुशिक्षित लोकही जेंव्हा पैसे घेऊन मतदान करतात तेंव्हा त्यांना निवडून आलेल्या उमेदवाराला बोलण्याचा ते अधिकार गमावत नाहीत का? याचाही विचार झाला पाहिजे.असेच होत राहिले तर फक्त श्रीमंत लोकच निवडणूक जिंकतील गरीब पण काम करणाऱ्यांना कोणी विचारणार नाही,त्यांनी निवडणूक सुद्धा लढवू नये,अशीच परिस्थिती आज सगळीकडे दिसते.सधन उमेदवार पैशाच्या जोरावर निवडणूक जिंकतो तर सतत पाच लोकांच्या कामी येणारा पण असधन उमेदवार मतदारांना द्यायला पैसे नसल्यामुळे अपयशी होतो. निवडून आलेले सधन उमेदवार पाच वर्षे लक्ष देत नाहीत पाच वर्षांनंतर मतदारांना पैसे वाटून पुन्हा निवडून येतात. काम करणारे पुन्हा अपयशी होतात. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषणात नाव घेतले नाही म्हणून नोकरीची पर्वा न करता मंत्र्यांचा निषेध करून मंत्र्याची मानसिकता दाखवणाऱ्या माधवीताईंनी पैसे घेऊन मतदान करणाऱ्यांच्या खणखणीत कानाखाली ठेवून दिली आहे.कुठे बाबासाहेबांसाठी हजारो रुपयांची रुबाबदार नोकरी सोडून मंत्र्यांचा निषेध करणारी माधवीताई जाधव आणि कुठे हजार पाचशेसाठी आपल्याच आंबेडकरवादी उमेदवाराच्या विरोधात मतदान करणाऱ्या बा भीमाच्या लेकी.फक्त लेकीच नाहीत तर लेकंसुद्धा समाजाला गद्दार होताना पाहून बा भीमाच्या लेकरांना मतदान करताना पैसे मागतात.आपल्या मतांची आणि ज्या बिचाऱ्यांना माहीतही नसेल अशा अनभिज्ञ मतदारांची बोली लावतात.'आमच्याकडे इतकी मते आहेत,किती द्याल,लवकर सांगा, नाहीतर दुसरा (जातीयवादी पक्षाचा) उमेदवार इतके इतके पैसे देत आहे,त्याच्यापेक्षा जास्त द्याल तर तुमचा विचार करू अन्यथा जातीयवादी उमेदवाराचे दरवाजे उघडे आहेतच.'काय बोलणार या भीम अनुयायांना ?. ते पैसे किती दिवस पुरतील? पैशाच्या जोरावर निवडून आलेले जातीयवादी उमेदवार पाच वर्षे उभे तरी करतील का? हजार पाचशेसाठी जातीयवादी उमेदवारांना पाच वर्षांसाठी निवडून देण्यासाठी मतदान करताना बोट कसे आखडत नाही, हेच कळत नाही. आज समाजमाध्यमांवर मोठमोठ्या पोस्ट करून मंत्री महाजनांचा माज उतरवण्याची भाषा करणारे कालच्या मतदानात मतांचा सौदा करत होते,हे ते सफसेल विसरले आहेत.या अशा लोकांमुळेच आंबेडकरी विचारांचे कमी उमेदवार निवडून येतात.हेच तोडपाणी करणारे लोक जेंव्हा संसदेवर,विधानभवनावर निळा झेंडा लावण्याचे स्वप्न बघतात तेंव्हा हसावे की रडावे, काहीच सुचत नाही.*

**कडू डोस आंबेडकरी विचारांच्या नेत्यांचे भाषण हे तितक्यापूरते ऐकू नका, तर शेवटपर्यंत त्यांच्या विचारांशी बांधील राहा.तुमच्या टाळ्या मिळाव्यात म्हणून त्यांचे भाषण नसते,हे लक्षात ठेवा. अजूनही जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका बाकी आहेत,तिथे तरी माधुरीताई जाधव यांच्यासारखा कणखरपणा दाखवा,हजार पाचशेला लाथ मारून आपले लोक निवडून द्या.तरच जयभीम म्हणा.अन्यथा.....*माधवीताई सारखी आंबेडकरी विचारांवर निष्ठा हवीआज २६ जानेवारी २०२६,भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन.यानिमित्ताने महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री तसेच नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक येथील पोलीस परेड ग्राउंडवर झेंडा वंदन केल्यानंतर केलेल्या संपूर्ण भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे एकदाही नाव घेतले नाही, त्यामुळे तिथे बंदोबस्ताला असलेल्या वन विभागाच्या कर्मचारी माधवीताई जाधव कानात जीव आणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव ऐकण्यास अधीर झाल्या होत्या, पण मंत्री गिरीश महाजन यांनी संपूर्ण भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे एकदाही नाव घेतले नाही, भाषण संपेपर्यंत कोणालाही काहीच आक्षेप नव्हता. पण बंदोबस्ताला असलेल्या माधवीताई पेटून उठल्या आणि त्यांनी मैदानात धाव घेऊन जोरजोरात मंत्री गिरीज महाजन यांचा निषेध करायला सुरवात केली,तेंव्हा उपस्थितांना कळले की,गिरीश महाजन यांनी संपूर्ण भाषणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले नाही. माधवीताईंनी वातावरण गंभीर केले.त्या सरकारी नोकरीत असूनही त्यांनी नोकरीची पर्वा केली नाही, नोकरी गेली तर वाळूच्या गाड्या भरेल,मातीकाम करेल,सस्पेंड केले तरी चालेल पण बाबासाहेबांचा अपमान सहन करणार नाही,ज्या बाबासाहेबांनी महिलांच्यासाठी आणलेले हिंदू कोड बिल संसदेत चर्चेत घेतले नसल्याने मंत्रिपदाचा राजीनामा दिला,ज्या बाबासाहेबांनी घटना लिहून सर्वांना समानाधिकार दिला, महिलांना सन्मान दिला,ज्यांच्यामुळे मी या पदावर आहे त्या बाबासाहेबांचे नाव मंत्री महाजनांनी मुद्दाम घेतले नाही,नामोल्लेख टाळून बाबासाहेबांची बदनामी केली,असा आरोप माधवीताईंनी केला आहे. जोपर्यंत गिरीश महाजन यांच्यावर ॲट्रोसिटी दाखल होत नाही,तोपर्यंत त्यांनी उपोषण सुरू केले आहे.याला म्हणतात धाडस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील निष्ठा नाहीतर आताच निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीत भीमाच्या लेकींचा (सुज्ञ लेकींचा अपवाद वगळता) वेगळाच अनुभव आला. तो अनुभव डॉ.रजनीकांत गायकवाड यांनी मांडला आहे.त्यांच्या मते निवडणुकीच्या दिवशी भीमाच्या लेकी हजार पाचशे घेतल्याशिवाय निवडणुकीला बाहेर पडत नव्हत्या.मतदानाची वेळ संपत आली होती,चार पाच वाजेपर्यंत भिमाच्या लेकी मतदानाला बाहेर पडत नव्हत्या. शेवटी ज्यांनी मतदानाचे पैसे दिले त्यांना मतदान करायला भीमाच्या लेकी बाहेर पडल्या.विशेष म्हणजे भिमाच्या लेकींनी पाहिले नाही की,आपण जातीयवादी पक्षांच्या उमेदवारांकडून पैसे घेऊन त्यांच्या खाल्लेल्या मिठाला जागून त्यांनाच मतं देत आहोत.हजारपाचशे किती दिवस पुरणार आहेत? ते तर त्याच दिवशी किंवा निवडणुकीचा निकाल लागण्या अगोदरच संपलेही असतील.त्यांच्या मतांमुळे जातीयवादी पक्षांचे उमेदवार निवडून आले.ज्या पक्षांना संपवण्यासाठी आंबेडकरी विचारांचे नेते जीवाचे रान करत असतात. त्यांच्या भाषणाला भीमाच्या लेकी अंतकरणापासून दाद देत असतात.तिथल्यातिथे निर्णय घेतात,की काही झाले तरी आंबेडकरी समाजाच्या उमेदवारालाच मत देणार.पण सभा संपली की काही दिवसात तो जोशही संपून जातो, आणि ऐन निवडणुकीत या माझ्या माय माऊल्या (काही अपवाद वगळता) मतदानासाठी पैसे घ्यायला थांबून राहतात.अगदी आंबेडकरी अनुयायी असलेल्या उमेदवारांकडून सुद्धा. युरोपमध्ये मतदानाचा अधिकार फक्त अमीर उमरावानांच होता,हळू हळू,श्रीमंतांना मतदानाचा अधिकार देण्यात आला,त्यानंतर जमीन मालकांना अधिकार देण्यात आला,कित्येक वर्षे गुलाम आणि शूद्रांना (काळ्यांना) मतदानाचा अधिकार नव्हता.महिलांना तर कित्येक वर्षे मतदानाच्या अधिकारासाठी वाट पहावी लागली.एमेलीन पॅनखर्स्ट या महिलेला आंदोलन करावे लागले.१९०३ मध्ये त्यांनी 'विमेन्स सोशल अँड पोलिटिकल युनियन' काढली .महिलांची संघटना बांधून त्यांनी मतदानाच्या अधिकारासाठी लढाई सुरू केली.मतदानाचा हक्क मिळावा म्हणून भव्य मोर्चे काढले.१९०८ मध्ये महिलांचा लाखोंचा मोर्चा संसदेवर काढला.त्यांना जेलमध्ये जावे लागले.त्यांनी जेलमध्ये आंदोलन सुरू केले,उपोषण केले.सततच्या संघर्षामुळे १९१८ मध्ये ३० वर्षे वयावरील मालमत्ताधारक महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला.सर्व महिलांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी १९२८ साल उजाडावे लागले.पण भारतात घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कलमाची ताकद दाखवली आणि प्रौढ स्त्री पुरुषांना मतदानाचा अधिकार दिला.मतदानासाठी त्यांनी गरीब श्रीमंत भेद केला नाही.टाटा बिर्ला यांच्या मताची किंमत आणि गरीबाच्या मताची किंमत ही सारखीच ठरली. ज्यांना चार दिवस खायला भेटत नाही,ज्यांना अस्पृश्य म्हणून हिनवले जाते,त्यांच्या मताची किंमत ही अति श्रीमंत लोकांच्या बरोबरीची करून ठेवली.बाबासाहेबांचे हे किती मोठे उपकार संपूर्ण भारतावर आहेत.सतत बाबासाहेबांचे नाव मुखात असणारे बाबासाहेबांचे अनुयायी जेंव्हा पैसे घेतल्याशिवाय मतदानाला बाहेर पडत नाहीत,तेंव्हा मन उद्विग्न होते.आज बाबासाहेब असते तर... सतत जातीयवादी पक्षांना मातीत गाडण्याची भाषा करणारे निवडणूकीच्या दिवशी भान विसरून जातीयवादी पक्षाच्या उमेदवारांकडून हजार पाचशे घेऊन मतदान कसे करतात, हेच कळत नाही.आज भारताचे चित्र काय आहे?या चित्राला आपणच कारणीभूत नाही का? याचा विचार होणार आहे का? पैसे घेऊन मतदान करणारे अडाणी किंवा गरीबच नाहीत तर सधन आणि सुशिक्षित लोकही जेंव्हा पैसे घेऊन मतदान करतात तेंव्हा त्यांना निवडून आलेल्या उमेदवाराला बोलण्याचा ते अधिकार गमावत नाहीत का? याचाही विचार झाला पाहिजे.असेच होत राहिले तर फक्त श्रीमंत लोकच निवडणूक जिंकतील गरीब पण काम करणाऱ्यांना कोणी विचारणार नाही,त्यांनी निवडणूक सुद्धा लढवू नये,अशीच परिस्थिती आज सगळीकडे दिसते.सधन उमेदवार पैशाच्या जोरावर निवडणूक जिंकतो तर सतत पाच लोकांच्या कामी येणारा पण असधन उमेदवार मतदारांना द्यायला पैसे नसल्यामुळे अपयशी होतो. निवडून आलेले सधन उमेदवार पाच वर्षे लक्ष देत नाहीत पाच वर्षांनंतर मतदारांना पैसे वाटून पुन्हा निवडून येतात. काम करणारे पुन्हा अपयशी होतात. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषणात नाव घेतले नाही म्हणून नोकरीची पर्वा न करता मंत्र्यांचा निषेध करून मंत्र्याची मानसिकता दाखवणाऱ्या माधवीताईंनी पैसे घेऊन मतदान करणाऱ्यांच्या खणखणीत कानाखाली ठेवून दिली आहे.कुठे बाबासाहेबांसाठी हजारो रुपयांची रुबाबदार नोकरी सोडून मंत्र्यांचा निषेध करणारी माधवीताई जाधव आणि कुठे हजार पाचशेसाठी आपल्याच आंबेडकरवादी उमेदवाराच्या विरोधात मतदान करणाऱ्या बा भीमाच्या लेकी.फक्त लेकीच नाहीत तर लेकंसुद्धा समाजाला गद्दार होताना पाहून बा भीमाच्या लेकरांना मतदान करताना पैसे मागतात.आपल्या मतांची आणि ज्या बिचाऱ्यांना माहीतही नसेल अशा अनभिज्ञ मतदारांची बोली लावतात.'आमच्याकडे इतकी मते आहेत,किती द्याल,लवकर सांगा, नाहीतर दुसरा (जातीयवादी पक्षाचा) उमेदवार इतके इतके पैसे देत आहे,त्याच्यापेक्षा जास्त द्याल तर तुमचा विचार करू अन्यथा जातीयवादी उमेदवाराचे दरवाजे उघडे आहेतच.'काय बोलणार या भीम अनुयायांना ?. ते पैसे किती दिवस पुरतील? पैशाच्या जोरावर निवडून आलेले जातीयवादी उमेदवार पाच वर्षे उभे तरी करतील का? हजार पाचशेसाठी जातीयवादी उमेदवारांना पाच वर्षांसाठी निवडून देण्यासाठी मतदान करताना बोट कसे आखडत नाही, हेच कळत नाही. आज समाजमाध्यमांवर मोठमोठ्या पोस्ट करून मंत्री महाजनांचा माज उतरवण्याची भाषा करणारे कालच्या मतदानात मतांचा सौदा करत होते,हे ते सफसेल विसरले आहेत.या अशा लोकांमुळेच आंबेडकरी विचारांचे कमी उमेदवार निवडून येतात.हेच तोडपाणी करणारे लोक जेंव्हा संसदेवर,विधानभवनावर निळा झेंडा लावण्याचे स्वप्न बघतात तेंव्हा हसावे की रडावे, काहीच सुचत नाही.

**कडू डोस आंबेडकरी विचारांच्या नेत्यांचे भाषण हे तितक्यापूरते ऐकू नका, तर शेवटपर्यंत त्यांच्या विचारांशी बांधील राहा.तुमच्या टाळ्या मिळाव्यात म्हणून त्यांचे भाषण नसते,हे लक्षात ठेवा. अजूनही जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका बाकी आहेत,तिथे तरी माधुरीताई जाधव यांच्यासारखा कणखरपणा दाखवा,हजार पाचशेला लाथ मारून आपले लोक निवडून द्या.तरच जयभीम म्हणा.अन्यथा.....*माधवीताई सारखी आंबेडकरी विचारांवर निष्ठा हवीआज २६ जानेवारी २०२६,भारताचा ७७ वा प्रजासत्ताक दिन.यानिमित्ताने महाराष्ट्र राज्याचे कॅबिनेट मंत्री तसेच नाशिक जिल्ह्याचे पालकमंत्री गिरीश महाजन यांनी नाशिक येथील पोलीस परेड ग्राउंडवर झेंडा वंदन केल्यानंतर केलेल्या संपूर्ण भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे एकदाही नाव घेतले नाही, त्यामुळे तिथे बंदोबस्ताला असलेल्या वन विभागाच्या कर्मचारी माधवीताई जाधव कानात जीव आणून डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव ऐकण्यास अधीर झाल्या होत्या, पण मंत्री गिरीश महाजन यांनी संपूर्ण भाषणात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे एकदाही नाव घेतले नाही, भाषण संपेपर्यंत कोणालाही काहीच आक्षेप नव्हता. पण बंदोबस्ताला असलेल्या माधवीताई पेटून उठल्या आणि त्यांनी मैदानात धाव घेऊन जोरजोरात मंत्री गिरीज महाजन यांचा निषेध करायला सुरवात केली,तेंव्हा उपस्थितांना कळले की,गिरीश महाजन यांनी संपूर्ण भाषणामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचे नाव घेतले नाही. माधवीताईंनी वातावरण गंभीर केले.त्या सरकारी नोकरीत असूनही त्यांनी नोकरीची पर्वा केली नाही, नोकरी गेली तर वाळूच्या गाड्या भरेल,मातीकाम करेल,सस्पेंड केले तरी चालेल पण बाबासाहेबांचा अपमान सहन करणार नाही,ज्या बाबासाहेबांनी महिलांच्यासाठी आणलेले हिंदू कोड बिल संसदेत चर्चेत घेतले नसल्याने मंत्रिपदाचा राजीनामा दिला,ज्या बाबासाहेबांनी घटना लिहून सर्वांना समानाधिकार दिला, महिलांना सन्मान दिला,ज्यांच्यामुळे मी या पदावर आहे त्या बाबासाहेबांचे नाव मंत्री महाजनांनी मुद्दाम घेतले नाही,नामोल्लेख टाळून बाबासाहेबांची बदनामी केली,असा आरोप माधवीताईंनी केला आहे. जोपर्यंत गिरीश महाजन यांच्यावर ॲट्रोसिटी दाखल होत नाही,तोपर्यंत त्यांनी उपोषण सुरू केले आहे.याला म्हणतात धाडस आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील निष्ठा नाहीतर आताच निवडणुका झाल्या. त्या निवडणुकीत भीमाच्या लेकींचा (सुज्ञ लेकींचा अपवाद वगळता) वेगळाच अनुभव आला. तो अनुभव डॉ.रजनीकांत गायकवाड यांनी मांडला आहे.त्यांच्या मते निवडणुकीच्या दिवशी भीमाच्या लेकी हजार पाचशे घेतल्याशिवाय निवडणुकीला बाहेर पडत नव्हत्या.मतदानाची वेळ संपत आली होती,चार पाच वाजेपर्यंत भिमाच्या लेकी मतदानाला बाहेर पडत नव्हत्या. शेवटी ज्यांनी मतदानाचे पैसे दिले त्यांना मतदान करायला भीमाच्या लेकी बाहेर पडल्या.विशेष म्हणजे भिमाच्या लेकींनी पाहिले नाही की,आपण जातीयवादी पक्षांच्या उमेदवारांकडून पैसे घेऊन त्यांच्या खाल्लेल्या मिठाला जागून त्यांनाच मतं देत आहोत.हजारपाचशे किती दिवस पुरणार आहेत? ते तर त्याच दिवशी किंवा निवडणुकीचा निकाल लागण्या अगोदरच संपलेही असतील.त्यांच्या मतांमुळे जातीयवादी पक्षांचे उमेदवार निवडून आले.ज्या पक्षांना संपवण्यासाठी आंबेडकरी विचारांचे नेते जीवाचे रान करत असतात. त्यांच्या भाषणाला भीमाच्या लेकी अंतकरणापासून दाद देत असतात.तिथल्यातिथे निर्णय घेतात,की काही झाले तरी आंबेडकरी समाजाच्या उमेदवारालाच मत देणार.पण सभा संपली की काही दिवसात तो जोशही संपून जातो, आणि ऐन निवडणुकीत या माझ्या माय माऊल्या (काही अपवाद वगळता) मतदानासाठी पैसे घ्यायला थांबून राहतात.अगदी आंबेडकरी अनुयायी असलेल्या उमेदवारांकडून सुद्धा. युरोपमध्ये मतदानाचा अधिकार फक्त अमीर उमरावानांच होता,हळू हळू,श्रीमंतांना मतदानाचा अधिकार देण्यात आला,त्यानंतर जमीन मालकांना अधिकार देण्यात आला,कित्येक वर्षे गुलाम आणि शूद्रांना (काळ्यांना) मतदानाचा अधिकार नव्हता.महिलांना तर कित्येक वर्षे मतदानाच्या अधिकारासाठी वाट पहावी लागली.एमेलीन पॅनखर्स्ट या महिलेला आंदोलन करावे लागले.१९०३ मध्ये त्यांनी 'विमेन्स सोशल अँड पोलिटिकल युनियन' काढली .महिलांची संघटना बांधून त्यांनी मतदानाच्या अधिकारासाठी लढाई सुरू केली.मतदानाचा हक्क मिळावा म्हणून भव्य मोर्चे काढले.१९०८ मध्ये महिलांचा लाखोंचा मोर्चा संसदेवर काढला.त्यांना जेलमध्ये जावे लागले.त्यांनी जेलमध्ये आंदोलन सुरू केले,उपोषण केले.सततच्या संघर्षामुळे १९१८ मध्ये ३० वर्षे वयावरील मालमत्ताधारक महिलांना मतदानाचा अधिकार मिळाला.सर्व महिलांना मतदानाचा अधिकार मिळण्यासाठी १९२८ साल उजाडावे लागले.पण भारतात घटनाकार डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कलमाची ताकद दाखवली आणि प्रौढ स्त्री पुरुषांना मतदानाचा अधिकार दिला.मतदानासाठी त्यांनी गरीब श्रीमंत भेद केला नाही.टाटा बिर्ला यांच्या मताची किंमत आणि गरीबाच्या मताची किंमत ही सारखीच ठरली. ज्यांना चार दिवस खायला भेटत नाही,ज्यांना अस्पृश्य म्हणून हिनवले जाते,त्यांच्या मताची किंमत ही अति श्रीमंत लोकांच्या बरोबरीची करून ठेवली.बाबासाहेबांचे हे किती मोठे उपकार संपूर्ण भारतावर आहेत.सतत बाबासाहेबांचे नाव मुखात असणारे बाबासाहेबांचे अनुयायी जेंव्हा पैसे घेतल्याशिवाय मतदानाला बाहेर पडत नाहीत,तेंव्हा मन उद्विग्न होते.आज बाबासाहेब असते तर... सतत जातीयवादी पक्षांना मातीत गाडण्याची भाषा करणारे निवडणूकीच्या दिवशी भान विसरून जातीयवादी पक्षाच्या उमेदवारांकडून हजार पाचशे घेऊन मतदान कसे करतात, हेच कळत नाही.आज भारताचे चित्र काय आहे?या चित्राला आपणच कारणीभूत नाही का? याचा विचार होणार आहे का? पैसे घेऊन मतदान करणारे अडाणी किंवा गरीबच नाहीत तर सधन आणि सुशिक्षित लोकही जेंव्हा पैसे घेऊन मतदान करतात तेंव्हा त्यांना निवडून आलेल्या उमेदवाराला बोलण्याचा ते अधिकार गमावत नाहीत का? याचाही विचार झाला पाहिजे.असेच होत राहिले तर फक्त श्रीमंत लोकच निवडणूक जिंकतील गरीब पण काम करणाऱ्यांना कोणी विचारणार नाही,त्यांनी निवडणूक सुद्धा लढवू नये,अशीच परिस्थिती आज सगळीकडे दिसते.सधन उमेदवार पैशाच्या जोरावर निवडणूक जिंकतो तर सतत पाच लोकांच्या कामी येणारा पण असधन उमेदवार मतदारांना द्यायला पैसे नसल्यामुळे अपयशी होतो. निवडून आलेले सधन उमेदवार पाच वर्षे लक्ष देत नाहीत पाच वर्षांनंतर मतदारांना पैसे वाटून पुन्हा निवडून येतात. काम करणारे पुन्हा अपयशी होतात. आज डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे भाषणात नाव घेतले नाही म्हणून नोकरीची पर्वा न करता मंत्र्यांचा निषेध करून मंत्र्याची मानसिकता दाखवणाऱ्या माधवीताईंनी पैसे घेऊन मतदान करणाऱ्यांच्या खणखणीत कानाखाली ठेवून दिली आहे.कुठे बाबासाहेबांसाठी हजारो रुपयांची रुबाबदार नोकरी सोडून मंत्र्यांचा निषेध करणारी माधवीताई जाधव आणि कुठे हजार पाचशेसाठी आपल्याच आंबेडकरवादी उमेदवाराच्या विरोधात मतदान करणाऱ्या बा भीमाच्या लेकी.फक्त लेकीच नाहीत तर लेकंसुद्धा समाजाला गद्दार होताना पाहून बा भीमाच्या लेकरांना मतदान करताना पैसे मागतात.आपल्या मतांची आणि ज्या बिचाऱ्यांना माहीतही नसेल अशा अनभिज्ञ मतदारांची बोली लावतात.'आमच्याकडे इतकी मते आहेत,किती द्याल,लवकर सांगा, नाहीतर दुसरा (जातीयवादी पक्षाचा) उमेदवार इतके इतके पैसे देत आहे,त्याच्यापेक्षा जास्त द्याल तर तुमचा विचार करू अन्यथा जातीयवादी उमेदवाराचे दरवाजे उघडे आहेतच.'काय बोलणार या भीम अनुयायांना ?. ते पैसे किती दिवस पुरतील? पैशाच्या जोरावर निवडून आलेले जातीयवादी उमेदवार पाच वर्षे उभे तरी करतील का? हजार पाचशेसाठी जातीयवादी उमेदवारांना पाच वर्षांसाठी निवडून देण्यासाठी मतदान करताना बोट कसे आखडत नाही, हेच कळत नाही. आज समाजमाध्यमांवर मोठमोठ्या पोस्ट करून मंत्री महाजनांचा माज उतरवण्याची भाषा करणारे कालच्या मतदानात मतांचा सौदा करत होते,हे ते सफसेल विसरले आहेत.या अशा लोकांमुळेच आंबेडकरी विचारांचे कमी उमेदवार निवडून येतात.हेच तोडपाणी करणारे लोक जेंव्हा संसदेवर,विधानभवनावर निळा झेंडा लावण्याचे स्वप्न बघतात तेंव्हा हसावे की रडावे, काहीच सुचत नाही.

कडू डोस आंबेडकरी विचारांच्या नेत्यांचे भाषण हे तितक्यापूरते ऐकू नका, तर शेवटपर्यंत त्यांच्या विचारांशी बांधील राहा.तुमच्या टाळ्या मिळाव्यात म्हणून त्यांचे भाषण नसते,हे लक्षात ठेवा.अजूनही जिल्हापरिषद आणि पंचायत समितीच्या निवडणुका बाकी आहेत,तिथे तरी माधुरीताई जाधव यांच्यासारखा कणखरपणा दाखवा,हजार पाचशेला लाथ मारून आपले लोक निवडून द्या.तरच जयभीम म्हणा.अन्यथा.....

